**<u>नियमित दिवाणी दावा क्र.३०/२०२४ मधील निशाणी ०५ वरील आदेश</u>**
**<u>(शोभा बटवलकर वगैरे वि. रामचंद्र शेटये वगैरे)</u>**

**<u>सीएनआर नं.एमएचएसआय–०५–०००१५५२०२४</u>**

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.२ यांच्याविरुद्ध दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९, नियम १ व २ प्रमाणे दावा मिळकतींमधील परिशिष्ट–अ मधील अ.क्र.३ (सर्व्हे क्र.३ हि.क्र.१४ड) या मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरूपाचे बांधकाम करू नये या अनुषंगाने तुर्तातूर्त ताकीद मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. <u>दावा मिळकत</u> –

अ)गाव मौजे–परबगाव, वेंगुर्ला, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग येथील सर्व्हे क्र.३, हिस्सा क्र.१४क, १४अ, १४ड (सदर मिळकतीस यापुढे सोयीच्या दृष्टिने 'दावा मिळकत परिशिष्ट–अ' असे संबोधण्यात येते.)

ब) गाव मौजे–परबगाव, वेंगुर्ला, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग येथील सर्व्हे क्र.३, हिस्सा क्र.१४ब (सदर मिळकतीस यापुढे सोयीच्या दृष्टिने 'दावा मिळकत परिशिष्ट–ब' असे संबोधण्यात येते.)

क) शिरोडा ग्रामपंचायत हद्दीतील गाव मौजे–शिरोडा, इमला क्र.११९५ (सदर मिळकतीस यापुढे सोयीच्या दृष्टिने 'दावा मिळकत परिशिष्ट–क' असे संबोधण्यात येते.)

ड) शिरोडा ग्रामपंचायत हद्दीतील गाव मौजे–शिरोडा, इमला क्र.१५९७ (सदर मिळकतीस यापुढे सोयीच्या दृष्टिने 'दावा मिळकत परिशिष्ट–ड' असे संबोधण्यात येते.)

**<u>प्रस्तुत अर्जाचे कामी वादींचे कथन थोडक्यात असे आहे की</u>**,

०३. दावा मिळकतीपैकी परिशिष्ट–अ मधील मिळकती या वादीच्या व परिशिष्ट–ब मधील मिळकती या प्रतिवादी यांच्या कुळपणाच्या असून सदर दोन्ही मिळकती या एकमेकास लगत आहेत. तसेच परिशिष्ट–ड मधील इमला हा वादीच्या

मालकीचा असून तो परिशिष्ट–अ मधील अ.क्र.१ (सर्व्हे क्र.३ हि.क्र.१४क) या मिळकतीमध्ये बांधलेला आहे. परिशिष्ट–क मधील इमला हा प्रतिवादी यांच्या मालकीचा असून तो परिशिष्ट–अ मधील अ.क्र. ३ (सर्व्हे क्र.३ हि.क्र.१४ड) च्या दक्षिण हद्दीवर बांधलेला आहे. सदर इमल्यांकडे जाणेकरीता दावा मिळकत परिशिष्ट–ब (सर्व्हे क्र.३ हि.क्र.१४ब) मधील मिळकतीमधून वाट असून सदरची वाट ही नकाशामध्ये A, B, C, D या इंग्रजी संज्ञेने दर्शविलेली आहे. दावा मिळकती या वादी यांच्या कुळपणाच्या मिळकती असून सदर मिळकतींवर वादी यांची दोन पिढ्यानपेक्षा अधिक काळ कब्जा व वहिवाट होती व आहे. दावा परिशिष्ट 'अ' मधील मिळकतीमध्ये जाणेयेणे करीता दावा परिशिष्ट–ब (सर्व्हे क्र.३ हि.क्र.१४ब) मधील मिळकतीमधून मार्ग आहे. परंतु सदर मार्गावर प्रतिवादी हे सांडपाणी, नारळाच्या झाडाच्या झावळ्या व काट्या टाकून वादीचा जाणेयेणेचा मार्गावर अडथळा निर्माण करतात. त्यामुळे वादीने प्रतिवादी यांना दि. ३०/०१/२०२४ रोजी त्याबाबत सांगितले असता प्रतिवादीने वादी क्र.१ यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच प्रतिवादीने दावा परिशिष्ट–ब मध्ये बांधकामाचे साहित्य आणून ठेवले आहे. प्रतिवादी हे दावा वाटेवर बांधकाम करून दावा परिशिष्ट–अ मधील वादीच्या मिळकतीमध्ये जाणेयेणेचा मार्ग कायमस्वरूपी बंद करण्याच्या प्रयत्नात आहेत व तशी धमकी प्रतिवादी हे वादी यांना देत आहेत.

०४.        वादी यांच्या पुढील कथनानुसार, वादी क्र. १ या उपचाराकरीता वादी क्र. २ व ३ यांच्यासोबत मुंबई येथे गेलेल्या होत्या. त्यावेळी दावा परिशिष्ट–अ मधील अ.क्र. ३ (सर्व्हे क्र.३ हि.क्र.१४ड) च्या मिळकतीमधील दक्षिण हद्दीवर पुर्व–पश्चिम ३० फुट व दक्षिण–उत्तर ६ फुट असे प्रतिवादी क्र. २ यांनी अतिक्रमण करून इमल्याचे वाढीव बांधकाम केले आहे. सदर अनधिकृत बांधकाम हटवून त्याचा खुला कब्जा वादी यांना द्यावा म्हणून वादी यांनी प्रतिवादी क्र. २ यांना सांगितले असता प्रतिवादी क्र. २ यांनी "मी बांधकाम काढणार नाही व परत विचारायला आलात तर तंगड्या तोडून हातात देऊ," अशी धमकी वादींना दिली. प्रतिवादी हा दावा परिशिष्ट–अ मधील असलेल्या वादी यांच्या मिळकतीमधील नारळाच्या झाडाचे उत्पन्न जबरदस्तीने घेण्याचा प्रयत्न करीत असतो व

दावा मिळकत हडप करणे करीता वादी यांना त्रास देत असतो. प्रतिवादी हे वादींना दावा मिळकतीमधून हुसकावून लावणेच्या प्रयत्नात आहे. तसेच प्रतिवादी क्र.२ हे त्यांनी सुरू केलेले बांधकाम पूर्ण करण्याच्या इराद्यात असून प्रतिवादी क्र.२ यांनी बांधकाम पूर्ण केल्यास वादींना अनेक कामे चालवावी लागणार आहेत व वादींचे पैशाच्या स्वरूपात कधीही न भरून येणार असे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०५.        प्रतिवादी यांनी त्यांना अनेक संधी देऊन देखील प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज हा त्यांच्या म्हणण्याविना चालविणेत येईल असा आदेश पारीत करण्यात आला.

०६.        वादी यांच्या अर्जातील व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचा व विधिज्ञांच्या युक्तिवादाचा विचार करता खालील वादप्रश्न माझे निर्णयाकरीता उपस्थित झाले असून त्यावरील माझे निर्णय मी कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी यांना प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नाही. |
| २. | सोयीचा समतोल वादी यांच्या बाजूने आहे, असे वादी सिध्द करतात का ? | नाही. |
| ३. | मागणी केल्याप्रमाणे तुर्तातूर्त मनाई न दिल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे असे वादी सिध्द करतात का ? | नाही |
| ४. | आदेश काय ? | **अर्ज नामंजूर करण्यात येतो.** |

०७.        प्रस्तुतकामी वादी यांनी त्यांचे अर्जाच्या पुष्ठ्यर्थ निशाणी ०४ येथील कागदयादीसोबत गाव मौजे–परबगाव, ता.वेंगुर्ला येथील सर्व्हे क्र.३, हिस्सा क्र.१४क, सर्व्हे क्र.३ हिस्सा क्र.१४अ, सर्व्हे क्र.३ हिस्सा क्र.१४ड, सर्व्हे क्र.३, हिस्सा क्र.१४ब यांचे सातबारा उतारे, शिरोडा ग्रामपंचायत येथील घर क्र.११९५ चा घरपत्रक उतारा व शिरोडा ग्रामपंचायत येथील घर क्र.१४२(ब) चा घरपत्रक उतारा इत्यादी कागदपत्रे दाखल केले आहेत.

## कारणमिमांसा

०८. वरील सर्व वादप्रश्न हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांचे विश्लेषण हे एकत्रीत केले आहे.

०९. प्रस्तुतकामी वादी यांनी दावा मिळकत परिशिष्ट–अ मधील अ.क्र. ३ (सर्व्हे क्र.३ हि.क्र.१४ड) येथील मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. २ यांनी कोणत्याही स्वरूपाचे बांधकाम करू नये, यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. वादी यांच्या कथनानुसार, दावा मिळकत परिशिष्ट –अ मधील मिळकत ही त्यांच्या कुळपणाची असून, परिशिष्ट–ड मधील इमला हा त्यांच्या मालकीचा आहे. तसेच प्रतिवादी क्र. २ हे परिशिष्ट–अ मधील अ.क्र. ३ (सर्व्हे क्र.३ हि.क्र.१४ड) येथील मिळकतीलगत ६ फूट रुंद व ३० फूट लांब असे अतिक्रमण करून बांधकाम करीत असून सदरचे बांधकाम पुर्ण झाल्यास ते काढून मिळणेकरीता वादींना अनेक कामे चालवावी लागणार आहेत व वादींचे पैशाच्या स्वरुपात कधीही भरुन न येणारे असे नुकसान होणार आहे. सदर कथनांच्या अनुषंगाने वादी यांच्या अर्जातील कथनांचे अवलोकन केले असता, वादी यांनी अर्जातील परिच्छेद क्र. ६ मध्ये प्रतिवादी क्र. २ यांनी अतिक्रमण करून बांधकाम पूर्ण केल्याचे स्पष्ट कथन केले आहे. तसेच, त्याअनुषंगाने वादी यांनी दाव्यामध्ये सदर बांधकाम काढून मिळावे, अशी विनंती देखील केलेली आहे. वादी हे त्यांच्या अर्जातील परिच्छेद क्र. ८ मध्ये प्रतिवादी क्र. २ हे बांधकाम पूर्ण करण्याच्या इराद्यात असल्याचे कथन करतात व त्याचवेळी परिच्छेद क्र.६ मध्ये वादी हे प्रतिवादी क्र. २ यांनी बांधकाम पूर्ण केले आहे असे कथन करतात. त्यामुळे वादी यांचे अर्जातील कथन हे परस्पर विरोधी असल्याचे स्पष्ट होते. तसेच वादी यांच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.२ यांनी बांधकाम पूर्ण केलेले असल्यास, आजरोजी प्रतिवादी क्र. २ पुन्हा तेच बांधकाम करीत असल्याचे वादी यांचे कथन मान्य करता येणार नाही. याव्यतिरिक्त वादी यांनी प्रतिवादी क्र. २ हे सदर बांधकामाव्यतिरिक्त परिशिष्ट–अ मधील अ.क्र. ३ येथील मिळकतीमध्ये अन्य कोणतेही नवीन अथवा अधिकचे बांधकाम करीत असल्याचे कोणतेही स्पष्ट कथन केलेले नाही. परिणामी, प्रतिवादी क्र. २ हे सध्या दावा मिळकत परिशिष्ट–अ मधील अ.क्र.३ येथील मिळकतीमध्ये बांधकाम करीत असल्याचा प्रश्नही सद्यस्थितीत उद्भवत नाही. याशिवाय, वादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र. २ यांना नेमके कोणते बांधकाम करण्यास मनाई करण्यात यावी,

याचेदेखील स्पष्टपणे कथन केलेले नाही. त्यामुळे वादी यांना प्रस्तुतकामी प्रथमदर्शनी (prima facie) केस असल्याचे दिसून येत नाही. तसेच, प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी यांचे पैशाच्या स्वरूपात भरून न निघणारे असे नुकसान होईल, असेही दिसून येत नाही. अशा परिस्थितीत, केवळ संदिग्ध व परस्परविरोधी कथनांच्या आधारे वादी यांनी मागणी केलेली तात्पुरत्या मनाई आदेशाची (ताकिदीची) दाद सद्यस्थितीत देणे न्यायोचित ठरणार नाही.

१०. सबब, उपरोक्त चर्चेनुसार, कायद्यातील तरतूदीनुसार वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र नाही. त्यामुळे वर नमूद कारणांकरीता मी वादप्रश्न क्र.१ ते ३ यांचे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे आणि वादप्रश्न क्र.४ चे उत्तरार्थ पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वादी यांचा नि.०५ कडील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. या अर्जाचा खर्च अंतिम निकालाच्या वेळी लक्षात घेतला जाईल.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

SOURABH JAYKUMAR CHIVATE

Digitally signed by SOURABH JAYKUMAR CHIVATE
Date: 2026.07.07 19:09:19 +0530

ठिकाणः– वेंगुर्ला. (**एस. जे. चिवटे**)

दिनांकः– ०७/०७/२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वेंगुर्ला.